लोकमत 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ : ३७०.६६ कोटींचे अंदाजपत्रक जाहीर; कौशल्य विकास

# संशोधनाला बळ, जनजागृतीवर भर

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्यासाठी संशोधन गरजेचे आहे. ते लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी पातळीवर संशोधन वाढीच्या दृष्टीने विविध योजना राबविण्यासाठी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात निधीची अधिक तरतूद केली आहे. त्यासह विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास आणि स्वच्छ भारत-स्वस्थ भारत, बेटी बचाओ अभियानाअंतर्गत जनजागृतीवर भर दिला आहे. चार कोटी ३३ लाख रुपयांच्या तुटीचे एकूण ३७० कोटी ६६ लाख रुपयांचे हे अंदाजपत्रक मंगळवारी अधिसभेने मंजूर केले.

विद्यापीठ कार्यालयातील या सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, आदी उपस्थित होते. सभेत 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी हे अंदाजपत्रक सादर केले. अधिसभेसमोर २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मांडलेल्या या अंदाजपत्रकात ३६६ कोटी ३३ लाख रुपये अपेक्षित जमा आणि अपेक्षित खर्च ३७० कोटी ६६ लाख इतका अंदाजित आहे. हे अंदाजपत्रक तुटीचे असले, तरी ते विद्यार्थिकेंद्रित, संशोधनाला बळ देणारे असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी स्पष्ट केले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ५१ कोटी ५५ लाख रुपयांनी अंदाजपत्रक वाढले आहे. दरम्यान, सध्या नवीन विद्यापीठ कायदा लागू करण्याची राज्य सरकारची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठांमधील विविध स्वरुपांतील अधिकार मंडळे बरखास्त केली आहेत. अधिसभेवर आलेले सदस्य या अधिसभेसाठी उपस्थित नव्हते. त्यामुळे विषयपत्रिकेवरील प्रश्नांवर चर्चा करून त्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया या सभेत झाली. (प्रतिनिधी)



## अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये

- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील संशोधन साहाय्य अनुदानासाठी ५० लाखांची तरतूद
- संलग्नित महाविद्यालयांतील पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांना संशोधन जागृती अनुदानासाठी ३० लाखांची तरतूद
- नोंदणीकृत संशोधन विद्यार्थ्यांसाठी पाच लाखांचे सुविधा साहाय्य अनुदान
- विद्यापीठातील विविध अधिविभागांच्या शैक्षणिक सहल अनुदानात दुपटीने वाढ
- कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रासाठी पाच लाखांची तरतूद
- स्वच्छ भारत - स्वस्थ भारत, बेटी बचाओ, अवयवदान जागृती अभियानासाठी विशेष तरतूद
- सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेची महाविद्यालयांपर्यंत व्याप्ती वाढविली असून त्यासाठी ४६ लाखांची तरतूद
- विद्यापीठातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार' देण्यासाठी दोन लाख रुपयांची तरतूद

"भविष्यातील शिक्षण हे संशोधन, समाजाभिमुख नवकल्पना, कौशल्य, तंत्रज्ञान यांवर आधारित असणार आहे. त्याद्वारे विद्यापीठ, शिक्षक आणि विद्यार्थी यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठीचामार्ग खुला होणार आहे. ते लक्षात घेऊन अंदाजपत्रकात योजनांसाठी निधीच्या तरतुदी केल्या आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षात जाहीर केलेल्या योजना, उपक्रम पुढे सुरु ठेवण्यासाठी निधीची तरतूद केली आहे.

- कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे

### अपेक्षित जमा

प्रशासकीय विभाग : ४५ कोटी ३१ लाख
विज्ञान अधिविभाग : २ कोटी ५७ लाख
शासनाकडून वेतन अनुदानापोटी : ६४ कोटी ४९ लाख
विविध संस्थांकडून प्रकल्पांसाठी : ७६ कोटी ३० लाख
संशोधन व विकास निधी : १४ कोटी ९४ लाख
घसारा निधी शिल्लक रक्कम : ११ कोटी १२ लाख
निलंबन लेखे : १२० कोटी ८४ लाख
इतर अधिविभाग : २ कोटी ५६ लाख
इतर उपक्रम : २८ कोटी २० लाख

### अपेक्षित खर्च

प्रशासकीय विभाग : ५१ कोटी २५ लाख
विज्ञान अधिविभाग : २ कोटी ९१ लाख
इतर अधिविभाग : २ कोटी ९४ लाख
विविध सेवा व इतर विभाग : ३१ कोटी ७६ लाख
घसारा निधी : ११ कोटी १२ लाख
संशोधन व विकास निधी : १४ कोटी ९४ लाख
शासकीय वेतन अनुदान : ६४ कोटी ४९ लाख
विविध संस्थांकडून मिळणाऱ्या निधीतून खर्च : ७६ कोटी ३० लाख
निलंबन लेखे : ११४ कोटी ९५ लाख

तरुण भारत 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे ३७०.६६ कोटीचे अंदाजपत्रक

## विद्यापीठाच्या अधिसभेत सादर : एकमताने मंजुरी, संशोधनासाठी ५० लाख रूपये

. प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठीचे ३७०.६६ कोटीचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. हे अंदाजपत्रक ४.३३ कोटी तुटीचे असले तरी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानत, संशोधनाला प्रोत्साहन देणारे आहे, अशी माहिती बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी दिली. त्यावर अधिसभा सदस्यांनी वार्षिक अंदाजपत्रकास एकमताने मंजुरी दिली. अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

यावेळी डॉ. डी. आर. मोरे यांनी अंदाजपत्रकातील ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट केली. यामध्ये शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांना संशोधन सहाय्य अनुदान ५० लाख रूपये, संलग्न महाविद्यालयातील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना जागृती अनुदान ३० लाख रूपये, नोंदणीकृत संशोधन विद्यार्थ्यांकरिता सुविधा सहाय्य अनुदान ५ लाख रूपये, विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीसाठी ५० हजार रूपये, कौशल्य आणि उद्योजकता



विकास केंद्र ५ लाख रूपये, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांसाठी १० लाख रूपये, स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान ६ लाख रूपये, बेटी बचाओ अभियान ५० हजार रूपये, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्थसहाय्य ४.३० लाख रूपये, अवयव दान जागृती अभियान ५० हजार रूपये, छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार २ लाख रूपये, विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना ४६ लाख रूपये, विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केलेल्या योजना पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने त्या-त्या लेखाशिर्षाखाली तरतुदी केल्या आहेत.

- वार्षिक अंदाजपत्रक ४.३३कोटी तुटीचे
- स्वच्छ भारत अभियानासाठी सहा लाख रूपये

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील विविध योजना पुढे चालू ठेवण्यासाठी प्रशासकीय विभागांकडून ४५.३१ कोटी रूपये, शास्त्र अधिविभागांकडून २.५७ कोटी, इतर अधिविभागाकडून २.२७ कोटी रूपये, इतर अधिविभागांकडून २.५६ कोटी जमा होण्याची अपेक्षा असून इतर उपक्रमामधून २८.२० कोटी रूपये असे एकूण ७८.६५ कोटी रूपये विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा होण्याची अपेक्षा आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून ६४.४९ कोटी रूपये, तर इतर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी ७६.३० कोटी रूपये जमा होणे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीमधून १४.९४ कोटी रूपये, याशिवाय घसारा निधी ११.१२ कोटी रूपये, निलंबन लेख्यांमधून १२०.८४ कोटी जमा होणे अपेक्षीत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील विविध विभागांच्या खर्चासाठी प्रशासकीय विभाग ५१.२५ कोटी, विज्ञान विभाग २.१९ कोटी, इतर विभाग २.९४ कोटी, विद्यापीठाच्या विविध सेवा व इतर उपक्रमामधून ३१.७६ कोटी, एकूण जमा ८८.८६ कोटी विद्यापीठाच्या स्वनिधीतून होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. याशिवाय घसारा निधी ११.१२ कोटी, संशोधन व विकास निधी १४.९४ कोटी, शासकीय वेतन अनुदानाचा खर्च ६४.४९ कोटी, विविध वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्चासाठी ७६.३० कोटी रूपये, निलंबन लेख्यांमध्ये ११४.९५ कोटी रूपये अशा एकूण ३७०.६६ कोटींची तरतूद आहे. जमा होणाऱ्या अंदाजित रक्कमेपेक्षा सन २०१६-१७ मध्ये होणारा खर्च ४.३३ कोटी एवढा अधिक असल्याने विद्यापीठाचे अंदाजपत्रक ४.३३ कोटी तुटीचे बनले आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. नमिता खोत, तसेच सर्व अधिसभा सभासद उपस्थित होते.

पुढारी 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे ३७० कोटींचे अंदाजपत्रक

## ४.३३ कोटींची तूट; 'सुवर्णमहोत्सवी' योजना पुढे चालू ठेवण्यासाठी तरतूद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थीकेंद्रित, विद्यापीठ व महाविद्यालयातील संशोधनास प्रोत्साहन देणारे २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठीचे प्रस्तावित ३७०.६६ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत मंजूर झाले. अंदाजपत्रकात ३६६.३३ कोटी अपेक्षित जमा असून ४.३३ कोटी रुपयांची तूट विद्यापीठ शिल्लक निधीतून भरून काढण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाची वार्षिक अधिसभा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. प्रारंभी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विविध विभागांच्या अहवालाचे वाचन केले. कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे यांनी सभेचे कामकाज पाहिले. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी अंदाजपत्रक अधिसभेसमोर मांडले. अधिसभेसमोर मान्यतेसाठी ठेवलेल्या २०१६-२०१७ या आर्थिक वर्षासाठीच्या अंदाजपत्रकात ३६६.३३ कोटी अपेक्षित जमा असून अपेक्षित खर्च ३७०.६६ कोटी आहे. अंदाजपत्रकाची काही ठळक वैशिष्ट्ये दर्शविण्यात आली आहेत.

यूजीसीच्या धर्तीवर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांना संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी संलग्न महाविद्यालयामधील शिक्षकांना संशोधन सहाय्य अनुदान ५० लाख देण्याची तरतूद करण्यात आली. संलग्नित महाविद्यालयांतील पदवीपूर्व विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना ३० लाख रुपये संशोधन जागृती अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली. विद्यापीठातील कोणतीही फेलोशिप न मिळालेल्या नोंदणीकृत संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी आर्थिक सहाय्य म्हणून ५ लाख रुपयांचे सुविधा सहाय्य अनुदान तरतूद करण्यात आली. विद्यापीठातील विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीसाठी प्रत्येक अधिविभागासाठी २० हजार रुपयांची तरतूद होती. २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून प्रति विद्यार्थी एक हजार रुपये किंवा जास्तीतजास्त ५० हजार रुपये प्रति अधिविभाग आर्थिक तरतूद करण्यात आली.

विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये प्राप्त होण्याच्या दृष्टीने कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. विविध प्रकारचे कौशल्य-प्रशिक्षण या केंद्रांअतर्गत विद्यार्थ्यांना देण्यासाठी कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्रासाठी ५ लाख रुपये अनुदान देण्यात आले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांसाठी दहा लाख रुपये तरतूद करण्यात आली. भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' अभियानांतर्गत विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या सहा गावांना विद्यापीठ हिस्सा म्हणून ६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. समाजामध्ये जागृती करण्यासाठी 'बेटी बचाओ अभियान' सुरू करण्यात आले असून यासाठी ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने क्रीडा अधिविभागांतर्गत योजना सुरू करण्यासाठी ४.३० लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाविषयी जागृती करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत हे अभियान सुरू करण्यासाठी ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. समाजासाठी भरीव योगदान दिलेल्या आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्राात योगदान देणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तीला हा पुरस्कार देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराच्या नावाने २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली.

विद्यापीठातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांपुरती मर्यादित असलेल्या सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेची व्याप्ती वाढवून महाविद्यालयातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही लागू केली असून यासाठी ४६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. विद्यापीठ सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केलेल्या योजना पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने त्या-त्या लेखाशिर्षाखाली तरतूदी करण्यात आल्या आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

"विद्यापीठाचे अंदाजपत्रक विद्यार्थी केंद्रीत व संशोधनास चालना देणारे आहे. कौशल्य वृद्धी, क्रीडा, उद्योगाशी संबंधित व वेगवेगळ्या अभियानासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. बृहत आराखड्यात नरेंद्र जाधव समितीच्या शिफारसी पाळल्या आहेत. काही नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

### बृहत आराखड्यास अधिसेभत मान्यता

विद्यापीठाच्या सर्वच अधिकार मंडळांची मुदत संपल्याने त्यांच्या अनुपस्थितीत अधिसभा झाली. कोणत्याही अधिसभा सदस्यांकडून कार्यवृत्तांमध्ये दुरुस्त्या सूचविण्यात आल्या नाहीत. अधिसभा बैठकीसाठी प्रश्न व ठराव आले नाहीत, त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास झाला नाही. २०१५ च्या अधिसभा बैठकीचा कार्यवृत्तांत, २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१६-१७ चे वार्षिक अंदाजपत्रक, ५२ वा वार्षिक अहवाल (मराठी आवृत्ती), निरंतर संलग्रीकरणाच्या परिनियमात सुधारणा, शासनाच्या नवीन निकषांनुसार तयार करण्यात आलेल्या २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी २०१५-१६ मधील प्रस्तावांच्या बृहत आराखड्यास अधिसेभत मान्यता देण्यात आली. तालुकावार महाविद्यालये, नवीन अभ्यासक्रम, विषय, पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर औषधनिर्माणशास्त्र, शुगर टेक्नालॉजी, हॉटेल मॅनेजमेंट, बॅचलर कोर्स इन खादी प्रॉडक्शन डिझाईन आदी नवीन अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे.

लोकमत 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कार्बन ट्रेडिंग, जैव तंत्रज्ञान अभियांत्रिकी हे नवे अभ्यासक्रम

## अधिसभेचा निर्णय; बदलांना मान्यता; दीड तासात सभा आटोपली

**कोल्हापूर :** एम. एस्सी. कार्बन ट्रेडिंग अॅण्ड ट्रान्सफर, जैव-तंत्रज्ञान अभियांत्रिकी, शुगर टेक्नॉलॉजी असे नवे अभ्यासक्रम विषय शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांत सुरु करण्यास अधिसभेने मंगळवारी मान्यता दिली. नवीन विद्यापीठ कायदा लागू करण्याची राज्य सरकारकडून कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे विद्यापीठाची विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद अशा स्वरूपांतील अधिकार मंडळे बरखास्त झाल्याने पदसिद्ध अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अवघ्या दीड तासांत सभा आटोपली.

अधिसभेला दुपारी बारा वाजता सुरुवात झाली. त्यात प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी सभेसमोर ठराव मांडले. त्यात सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा या कार्यक्षेत्रांतील तालुका आणि विद्याशाखानिहाय ४६ प्रस्तावांच्या ठरावाला मान्यता देण्यात आली. कोल्हापूर आणि सांगलीमध्ये संशोधन केंद्र साकारण्यासह बी. ए. मास कम्युनिकेशन, अॅनिमेशन, संगीत, मेट्रॉलॉजी, बी.एस्सी., रिमोट सेन्सिंग, बी.कॉम., माहिती व तंत्रज्ञान, असे एकूण ८४ नवे अभ्यासक्रम आणि विषय हे सुरु करण्यास मान्यता दिली. त्यात कला शाखेचे १७, 'विज्ञान'चे ३८, 'वाणिज्य'चे २२ आणि इतर स्वरूपांतील ७ अभ्यासक्रम, विषयांचा समावेश आहे. विद्यापीठाचा ५२ वा वार्षिक अहवाल, संलग्नीकरणाच्या परिनियमांतील बदलांना मान्यता देण्यात आली. (प्रतिनिधी)

### संशोधनासाठी १ कोटी ९ लाख



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने राबविलेल्या उपक्रम, कार्यक्रमांचा आढावा सादर केला. त्यात विद्यापीठातील संशोधन प्रकल्पांसाठी एकूण १ कोटी ९ लाख २ हजार ६०० रुपये अनुदान मिळाले आहेत. विद्यापीठाच्या ग्रंथालयातील वाय-फाय सुविधेसाठी ५०० विद्यार्थ्यांनी केलेली नोंदणी तसेच विद्यापीठाच्या ५२ व्या दीक्षांत समारंभाचे ऑनलाईन थेट प्रक्षेपण एक लाख जणांनी पाहिल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

Times of India 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Students, faculties welcome increased funds

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Students and faculties have welcomed the increased funds provided in various sectors of the university's 2016-17 budget.

The Shivaji University, Kolhapur (SUK) has increased funding for educational tours from Rs 20,000 to Rs 50,000.

Apart from this, the university has also increased research grants to students and faculty members.

Yuvraj Aundhkar, a postgraduate student from the university, welcomed the provision to grant financial assistance to research scholars who did not get any fellowship from any funding agency. He said that the move will be motivating for students willing to pursue a career in research.

> Granting financial assistance to faculty members in undergraduate courses will change the course of research at the undergraduate level. In almost all UG colleges, research is not a priority. This grant might revive the lost interest faculty members should have towards research,
>
> **Suhas Lakde** | ENGINEERING FACULTY MEMBER

Prajakta Patil, a postgraduate student in drama, said that the increased amount provided for educational tours is a good move as the university departments will have the liberty to choose the right destination without being budget conscious.

Suhas Lakde, an engineering faculty member, said that there the new provisions in the budget make it not only student-friendly, but is good for teachers as well.

"Granting financial assistance to faculty members in undergraduate courses will change the course of research at the undergraduate level. In almost all UG colleges, research is not a priority. This grant might revive the lost interest faculty members should have towards research," he said.

Another faculty member from a city-based college, said that the provisions for social awareness campaigns in the budget is a unique feature that will directly involve students from different courses to interact with the society on different issues.

Times of India 12.3 MAR 2016

# University focuses on more research grants

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) on Tuesday presented its budget for the upcoming 2016-17 academic year on Tuesday in the annual senate meeting.

The budget, however, showed an expenditure of Rs 370 crore compared to the deposits made of Rs 366 crore.

The university budget has increased by almost Rs 50 crore from last year. The university recorded an expenditure of Rs 319 crore, compared to the deposits of Rs 314 crore last year.

The Board of Colleges and University Development (BCUD) director, D R More, while presenting the budget said that the deficit will be covered through research and development funds.

The rest of the funds will be covered through depreciation costs.

The university budget for the upcoming 2016-17 academic year focuses on research-based activities through higher funds for research fellows and faculty members.

There are funding provisions for various social initiatives like Swachh Bharat Swastha Bharat, Beti Bachao and organ donation awareness.

"A provision of Rs 50 lakh has been made for teachers studying in affiliated colleges in the university to encourage them to take part in research. For encouraging undergraduate (UG) students in research activities, the university has made a provision of Rs 30 lakh. Another unique initiative that we have made is to grant funds to research scholars, who did not get any fellowship from any funding agency. We have made a provision of Rs 5 lakh for this," More said.

He said that in addition to this, the university has allotted Rs 46 lakh for its Golden Jubilee Research Scholarship scheme.

"Since last year, this has been extended to research scholars from university-affiliated colleges as well," More said.

Taking a step ahead in

## SUK BUDGET HIGHLIGHTS



### Department funds

- Administrative and other departments | 45.31
- State sanctioned salary grants | 64.49
- Funds from different organizations for projects | 76.3
- Funds for different department-led initiatives | 78.65
- University research and development funds | 14.94
- Depreciation cost | 11.12
- Debt head | 120.84

### SUK expenditure for 2016-17

**Department funds**

- Proposed expenditure from university funding | 88.86
- Government salary expenditure | 64.49
- Other financial organizations funding | 76.3
- Debt head | 114.95

*(All figures in Rs crore)*

### FACTS & Figures

- Total deposits | ₹366.33cr
- Total Expenditure | ₹370.66cr
- **₹46 lakh** for the Golden jubilee research scholarship scheme
- Focus on research activities with increased funding for students, faculties
- Focus on social activities with provisions for Swachh Bharat, Beti Bachao and organ donation awareness initiatives
- Chhatrapati Shivaji Maharaj award, which will be a national award and conferred on a person who has made commendable social contributions in the social, financial, or educational fields
- **₹5 lakh** for skill development centre
- Increased funding for educational tours

Rs 50,000 for the Beti Bachao awareness campaign and Rs 50,000 for the organ donation awareness initiative.

More said that from 2016-17, the university will also confer the Chhatrapati Shivaji Maharaj award. This will be a national award and be conferred to a person who has made commendable social contributions in the social, financial or educational fields.

A provision of Rs 2 lakh

ting in the International Sports event, the university has made a provision of Rs 4.30 lakh, as financial assistance.

Devanand Shinde, the SUK vice-chancellor, said, "It is a student-centric budget, where colleges as well as university students were included through various initiatives. It will make sure that research remains one of the primary concerns of the university. Along with this, the inclusion of various new and

Times of India 23 MAR 2016

# Many new courses in offing in SUK master plan

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has received 102 proposals for starting new courses in the division from 2016-17 academic year.

The proposed subjects were shared during the annual senate meeting on Tuesday.

According to the master plan of the subjects, courses such as BSc in renewable energy, Khadi production and design, MSc in alcohol technology and MSc in carbon trading & transfer among others have been proposed.

D R More, director of Board of Colleges and University Development (BCUD) in SUK, said, "We have received proposals for starting new colleges, subjects or divisions for the academic year 2016-17. But from the 2017-18 academic year, the university have to present a five-year plan to the state government. This is the last year of yearly proposals."

More said the university received many proposals for starting conventional as well as professional courses.

The subjects offered in conventional courses such as BSc, BCom and BA as well as the professional ones are unique in nature. All the courses have been included in the master plan based on the uniform criteria suggested by the Narendra Jadhav committee last year.

The committee had suggested inclusion of innovative courses, minimum distance of 20km between the proposed college and the existing one in the surrounding area, and starting women-oriented courses for their empowerment.

Earlier last year, the SUK received over 300 proposals for starting new colleges, courses, subjects, additional divisions and new streams among others. After the state government issued directives to invite fresh proposals from affiliated colleges for 2016-17, the university had asked to submit applications by December 31.

More said, "The existing and new educational institutes affiliated to the state universities submit their proposals for starting new courses or subjects every year, which later are sent to the state government for approval."

सकाळ 23 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे ३७० कोटींचे अंदाजपत्रक

## संशोधनास प्रोत्साहनाचे उद्दिष्ट : मूल्यमापन अहवाल दुरुस्तीसह मान्य

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत २०१६-१७ चे ३७० कोटी ६६ लाख रुपयांचे अंदाजपत्रक आज सादर झाले. विद्यार्थी केंद्रित व संशोधनास प्रोत्साहन देणारे हे अंदाजपत्रक असून, संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनसाह्य अनुदान ५० लाख, पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना संशोधन जागृती अनुदान ३० लाख व नोंदणीकृत संशोधक विद्यार्थ्यांसाठी सुविधासाह्य ५ लाख रुपये अशी तरतूद अंदाजपत्रकात आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

अधिसभेसाठी सदस्यांकडून प्रश्न व ठराव मागविले; मात्र सदस्यांकडून



बैठकीसाठी प्रश्न व ठराव न आल्याने कामकाजात प्रश्नोत्तरे झाली नाहीत. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाचा आढावा सादर केल्यानंतर बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी २०१६-१७ चे अंदाजपत्रक सादर केले. हे अंदाजपत्रक व मूल्यमापन अहवाल दुरुस्तीसह मान्य केला. ५२ वा वार्षिक अहवालही मान्य केला.

या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. डी. के. गायकवाड, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

### विभागांकडून अपेक्षित जमा

: (एकूण ३६६ कोटी ३३ लाख, खर्च-३७० कोटी ६६ लाख)

- प्रशासकीय विभाग- ४५ कोटी ३१ लाख
- शास्त्र अधिविभाग - २ कोटी ५७ लाख
- इतर अधिविभाग - २ कोटी ५६ लाख
- अन्य उपक्रम- २८ कोटी २० लाख
- वेतन अनुदानापोटी शासनाकडून- ६४ कोटी ४९ लाख
- संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी- ७६ कोटी ३० लाख
- संशोधन व विकास निधीतून- १४ कोटी ९४ लाख
- घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून- ११ कोटी १२ लाख
- निलंबन लेख्यांतून- १२० कोटी ८४ कोटी

### अंदाजपत्रकाची ठळक वैशिष्ट्ये

- प्राध्यापकांना संशोधनसाह्य अनुदान- ५० लाख
- विद्यार्थ्यांना संशोधन जागृती अनुदान- ३० लाख
- संशोधक विद्यार्थ्यांसाठी सुविधासाह्य अनुदान- ५ लाख
- शैक्षणिक सहल अनुदान- प्रति अधिविभाग ५० हजार
- कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र- ५ लाख
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त विविध उपक्रमांसाठी- १० लाख
- स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान- ६ लाख
- बेटी बचाओ अभियान- ५० हजार
- आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्थसाह्य- ४ कोटी ३० लाख
- अवयव दान जागृती अभियान- ५० हजार
- छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार- २ लाख
- संशोधक विद्यार्थ्यांसाठी सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्तीसाठी- ४६ लाख